


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ७९, शनिवार १५ फेब्रुवारी २०२५ | ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

# सुप्यातही रोड रॉबरी !

■ तीन भामटयांच्या मुसक्या आवळल्या ■ एलसीबीची कारवाई ■ भितीचे वातावरण थांबता थांबेना

सुपा : प्रतिनिधी

**सुपा येथील वाळवणे चौकात गाडी बंद पडल्याचा बहाणा करून गाडीत बसविलेल्या सतीश पठारे यांना लुटणाऱ्या तिघा भामटयांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुसक्या आवळल्या. या टोळीतील एकजण अद्याप फरार आहे. सुपा, पारनेरमध्ये रोड रॉबरी झाल्याने प्रवाशांमध्ये भितीचे वातावरण आहे.**

११ फेब्रुवारी रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास सतीश मधुकर पठारे रा. बँक कॉलनी, सुपा, ता. पारनेर हे वाळवणे चौकात उभे असताना भामटयांनी त्यांना गाडी बंद पडल्याचा बहाणा करून मदतीसाठी त्यांना गाडीत बसविले. पठारे हे कारमध्ये बसल्यानंतर कार वाळवणे गावाच्या दिशेने घेऊन जात पठारे यांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्या मोबाईलमधील फोन पे वरून ७९ हजार रूपये ट्रान्स्फर करून घेतले. त्याच परिसरात कार फिरवून त्यांचे कपडे काढून घेण्यात आले. त्यांना नगर पुणे महामार्गावरील सुप्यानजीकच्या पवारवाडी घाटामध्ये सोडून देण्यात आले. पठारे यांच्या फिर्यादीवरून या टोळीविरोधात सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार संदीप पवार, अतुल लोटके, सोमनाथ झांबरे, किशोर शिरसाठ, विशाल तनपुरे, प्रशांत राठोड व उमाकांत गावडे हे करत होते. दि. १३ फेब्रुवारी रोजी हे पथक तांत्रीक विश्लेश्नाच्या आधारे गुन्हयाचा तपास करत असताना बोल्हेगांव, नगर येथील समीर गफफार शेख याने त्याच्या साथीदारांसह केल्याची माहीती मिळाली. त्याने गुन्हयाची कबुली दिल्यानंतर त्याच्या साथीदारांना पकडण्यात यश मिळविले. त्यांच्याकडून गुन्हयात वापरण्यात आलेली हुंडाई कार क्र. एम एच १२ ई एक्स ६७७८ सह १५ हजार रूपयांची रोकड जप्त करण्यात आली. आरोपींना सुपा पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक मोनिका जोजाट या करत आहेत.



■ नगर-पुणे महामार्गावर रोड रॉबरी करणाऱ्या टोळीच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुसक्या आवळल्या.

### हे आहेत आरोपी

**समीर गफ्फार शेख वय ३० रा. बोल्हेगांव, वैभव सुरेश कौठाळे वय ३२ रा. इरिगेशन कॉलनी, देवदैठण, ता. श्रीगोंदे, अक्षय दशरथ पडवळ वय २९ रा. बोल्हेगांव या तिघांना पोलीसांनी अटक केली असून त्यांचा साथीदार खंडू उर्फ संदीप मिठू काळे रा. नागापुर हा फरार आहे.**

# टॉरल इंडियाची सुप्यात ५०० कोटींची गुंतवणूक

■ १ हजार २०० जणांना रोजगार मिळणार
■ हे शांततेचे प्रतिक ! खा.नीलेश लंके

सुपा : सतीश डोंगरे

**टॉरल इंडिया या आघाडीच्या एकात्मिक अॅल्युमिनियम फाउंड्रीने सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीमध्ये ५०० कोटींची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. या उद्योगामुळे पारनेर तालुक्यातील १ हजार २०० बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होणार आहे.**

टॉरल इंडियाने त्यांच्या प्रगत उत्पादन सुविधेचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत सांमजस्य करार केला आहे. पुण्यातील टॉरल इंडियाची सध्याची ३ लाख चौरस फुट सुविधा उत्पादन डिझाईनपासून ते गुणवत्ता चाचणी, रंगकाम, असेंब्ली, आणि वितरणापर्यंत व्यापक अॅल्युमिनियम सॅड-कास्टिंग सोल्यूशन प्रदान करते. उर्जा संरक्षण एरोस्पेस, सागरी, रेल्वे आणि आरोग्य सेवा यासारख्या क्षेत्रातील वाढती मागणी पुर्ण करण्यासाठी विस्तारित सुपा येथील सुविधा चार पट मोठी असेल.

या महत्वपुर्ण गुंतवणूकीसह टॉरेल इंडियाचे उद्दीष्ट नवोपक्रमांना चालना देणे, स्थानिक प्रतिभेला सक्षम करणे आणि महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि आर्थिक महत्वाकांक्षेत योगदान देताना महत्वाच्या उद्योगांमध्ये भारताचे स्वावलंबन वाढविणे आहे.



■ टॉरल इंडिया या कंपनीचे एमडी व सीईओ भरत गिते यांनी राळेगणसिध्दी येथे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भेट घेऊन आशिर्वाद घेतले.

### टॉरल इंडियासाठी निर्णायक क्षण !

५०० कोटी रूपयांची गुतवणूक टॉरल इंडियासाठी एक निर्णायक क्षण आहे, कारण आम्ही प्रगत उत्पादनात नवीन उंची गाठत आहोत. सुपा प्लान्टचा विस्तार केवळ क्षमता वाढविण्यासाठी नाही तर तो उद्योगांचे विकेंद्रीकरण टियर २ आणि टियर ३ क्षेत्रांना सक्षम बनविणे आणि १ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून योगदान देण्याबद्दल आहे.

भरत गिते, एमडी व सीईओ

### हे शांततेचे प्रतिक !

सुपा एमआयडीसी हे शांततेचे प्रतिक आहे. त्यामुळे अनेक उद्योग येथे येत आहेत. अनेक कंपन्या या औद्योगिक क्षेत्रात येण्यास तयार असून ते उद्योजक, कंपनी व्यवस्थापन आपल्या संपर्कात आहेत. सुपा औद्योगिक क्षेत्राची बदनामी करणे हा काही लोकांचा धंदा आहे. त्यांनी आपल्याकडे काय चालले आहे हे आगोदर पहावे त्यानंतर इतरांवर चिखलफेक करावी.

खासदार नीलेश लंके, लोकसभा सदस्य






# स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती
# शिवार



# लागवड पौष्टिक चारा पिकांची...

उन्हाळी हंगामामध्ये हिरव्या चाऱ्याचा तुटवडा जास्त प्रमाणात दिसून येतो. हे लक्षात घेऊन उन्हाळी हंगामामध्ये पुरेशा हिरव्या चाऱ्यासाठी संकरित नेपियर, बाजरी, कडवळ, मका, चवळी या चारा पिकांच्या सुधारित जातींची लागवड करावी.

## संकरित नेपियर

भरपूर उत्पादन आणि वर्षभर हिरवा चारा देणारे हे पीक आहे. हे गवत बहुवर्षायू, जास्त उत्पादन, जलद वाढणारे आहे. एकदा लागवड केल्यास हे पीक ४ ते ५ वर्षांपर्यंत उत्पादन देते. लागवडीसाठी बाएफ संकरित नेपियर १०, बाएफ संकरित नेपियर-११, फुले यशवंत या जातींची निवड करावी. लागवड कांड्यापासून अथवा ठोंबापासून करतात. त्यासाठी हेक्टरी १८,००० ते २०,००० बेणे लागते. लागवड सरी वरंबा पद्धतीने करावी. दोन सरीतील अंतर हे ३ फूट ठेवून सरीच्या बगलेत एका बाजूला जमिनीत २ ते ३ इंच खोल २ फुटांच्या अंतराने लावावे. लागवडीच्या वेळी हेक्टरी ४० किलो नत्र, ८० किलो स्फुरद आणि २० किलो पालाश अशी खतमात्रा द्यावी. लागवडीपासून ७० ते ७५ दिवसानंतर पीक कापणीस तयार होते. त्यानंतरच्या कापण्या ४५ ते ५० दिवसांनी कराव्यात. हे बहुवार्षिक गवत असल्याने कापणी करताना २ ते ३ इंच जमिनीपासून वर कापावे. दर तीन ते चार कापणीनंतर ४० किलो नत्राची मात्रा द्यावी. या गवतापासून वर्षभरात ६ ते ७ कापण्या मिळतात. हेक्टरी १२० ते १५० टन हिरवा चारा मिळतो.

## मका

हिरव्या चाऱ्याच्या निर्मितीसाठी बागायती भागामध्ये लागवडीसाठी योग्य आहे. हे पीक जोमाने वाढणारे, भरपूर उत्पादन देणारे, जनावरांच्या आवडीचे आहे. यामध्ये २० ते २२ टक्के शुष्क पदार्थ आणि ९ ते १० टक्क्यांपर्यंत प्रथिने मिळतात. हे पीक मुरघास बनविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. हेक्टरी ७५ ते १०० किलो बियाणे लागते. आफ्रिकन टॉल, जे -१००६, सीओएचएम-८ या जातींची लागवड करताना दोन ओळींतील अंतर ३० सेंमी ठेवावे. हेक्टरी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश अशी खत मात्रा द्यावी. कापणी साधारणतः पेरणीपासून ७० ते ७५ दिवसांपर्यंत पीक फुलोऱ्यात असेपर्यंत करावी. योग्य वेळी कापणी केल्यास हेक्टरी ५५ ते ६० टन हिरवा चारा मिळतो.



## चवळी

चवळी हे द्विदल वर्गातील चाऱ्याचे उत्तम पीक आहे. ५५ ते ६० दिवसांत हे पीक घेता आहे. याचा चारा पालेदार, मऊ आणि सकस असतो. हिरव्या चाऱ्यामध्ये १६ ते १८ टक्के प्रथिने असतात. चवळी हे संपूर्ण पीक घेण्यास उत्तम आहे तसेच मिश्रपीक म्हणून मका, ज्वारी, बाजरी यांसारख्या एकदल चारा पिकांतही घेता येते. चवळीचे बेवडही उत्तम असल्याने नंतरचे पीक जोमदार येते. हेक्टरी ४० किलो बियाणे लागते. इतर एकदल वर्गीय पिकांमध्ये उदा. मका, ज्वारी, बाजरी मिश्रपीक म्हणून पेरणी करावयाची झाल्यास हेक्टरी २० किलो एवढे बी मिसळावे. मिश्रपीक पेरावे किंवा पेरताना एकदल पीक आणि चवळीचे २:२ ओळी हे प्रमाण ठेवावे. लागवडीसाठी ईसी-४२१६, युपीसी-९२०२ या जातींची निवड करावी. पेरणीनंतर ५५ ते ६० दिवसात कापणी करावी. हेक्टरी ३० ते ३५ टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते.

## कडवळ

या पिकामध्ये ८ ते ९ टक्के प्रथिने तसेच २० ते २५ टक्के शुष्क पदार्थ असतात. हलकी जमीन व कमी पाणी अशा भागामध्ये ज्वारीची लागवड करावी. या पिकाची उत्तम वाढ होऊ शकते. पेरणी पद्धतीने लागवड करण्यासाठी हेक्टरी ४० ते ५० किलो बियाणे वापरावे. लागवडीसाठी सीओएफएस-२९ सीओएफएस - ३१, मालदांडी, फुले रुचिरा, फुले गोधन या जातींची निवड करावी. हेक्टरी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश खताची मात्रा द्यावी. दोन ओळींतील अंतर २५-३० सेंमी ठेवून पेरणी करावी. पेरणीनंतर लगेच पाणी द्यावे. पिकाच्या सुरुवातीच्या कालावधीमध्ये हायड्रोसायानिक ॲसिड हे विषारी द्रव्य असल्याने कापणी ४५ दिवसांच्या आत करू नये. पीक ५० टक्के फुलोऱ्यात असताना म्हणजेच पेरणीपासून ८५ ते ९० दिवसांनी कापणी करावी. बहुवर्षायू ज्वारीची पहिली कापणी पेरणीपासून ५० ते ५५ दिवसांनी जमिनीपासून ४ ते ५ इंच अंतर ठेवून करावी. नंतरच्या कापण्या ४५ ते ५० दिवसांनी कराव्यात. योग्य प्रकारे नियोजन केलेल्या ज्वारीपासून हेक्टरी ४० ते ४५ टन हिरवा चाऱ्याचे उत्पादन मिळते.

## बाजरी

बाजरी हे एकदल वर्गातील हिरवा चारा देणारे उत्तम पीक आहे. हा चारा पौष्टिक असतो. चारा पालेदार, रसाळ, गोड, लव विरहित, मऊ, उंच वाढणारा, भरपूर फुटवे असणारा आहे. ५ ते ६ महिन्यांच्या कालावधीत तीन कापण्या मिळून भरपूर व चांगल्या प्रतीचा चारा मिळतो. मार्च महिन्यात पेरणी करावी. ज्वारी व मक्यापेक्षा बाजरीला कमी पाणी लागते, जास्त उत्पादन मिळते. हेक्टरी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश अशी खतमात्रा द्यावी. बाजरीचा हिरवा चारा तसेच वाळलेला चारा पौष्टिक असतो. यामध्ये ८.५ ते ९.५ टक्के प्रथिने असतात. मुरघास चांगला तयार होतो. दोन कापण्यांपासून हिरवा चारा आणि तिसऱ्या कापणीपासून धान्य आणि वाळलेला चाराही मिळतो. हेक्टरी १० किलो बियाणे लागते. दोन ओळींतील अंतर ३० सेंमी ठेवून पेरणी करावी. लागवडीसाठी बाएफ बाजरा- १, बाएफ बाजरा-५, बाएफ बाजरा-६ या जातींची लागवड करावी. चाऱ्यासाठी पहिली कापणी पीक ५० टक्के फुलोऱ्यात असताना म्हणजेच पेरणीनंतर ५० ते ५५ दिवसांनी करावी. खोडव्याची वाढ जोमदार होण्यासाठी पिकाची कापणी जमिनीच्यावर चार ते सहा इंच ठेवून करावी. दुसरी व तिसरी कापणी, पहिल्या व दुसऱ्या कापणीनंतर ४५ ते ५० दिवसांनी करावी. पिकाची उत्तम निगा ठेवल्यास पहिल्या कापणीतून हेक्टरी ५० ते ५५ टनापर्यंत हिरवा चारा मिळतो. नंतरच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या कापणीपासून हेक्टरी ३५ ते ४० टन हिरवा चारा मिळतो. अशाप्रकारे १५० ते १६० दिवसांत तीन कापण्यांपासून एकूण हेक्टरी १२० ते १३० टन हिरवा चारा मिळतो.



**लसूण लागवडीसाठी सुधारित जातींचे बेणे वापरावे. मागील हंगामात तयार झालेल्या थंड व कोरड्या जागेत साठवून पुरेशी विश्रांती मिळालेले मोठ्या आकाराचे गड्डे लागवडीसाठी निवडावेत. कंद चांगला पोसण्यासाठी जमिनीचा एक ते दीड फुटापर्यंतचा भाग भुसभुशीत असणे आवश्यक आहे.**

# तंत्र लसूण लागवडीचे...

लसूण हे एक महत्त्वाचे कंदवर्गीय पीक म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील बहुतांशी जिल्ह्यात लसूण पिकाची लागवड केली जाते. दैनंदिन आहारात, मसाले निर्मिती, विविध प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करताना लसणाचा वापर केला जातो. लसणात विविध औषधी गुणधर्म असून श्वसन विकार, खोकला, दमा, फुफ्फुस आणि पोटाचे विकार, कान व डोळ्यांचे, उच्च रक्तदाब, हृदय रोग, कर्करोग, त्वचा विकार इत्यादींवर लसूण हे गुणकारी औषध आहे. तसेच लसणाच्या सेवनामुळे पचनसंस्था चांगली होते.

## लागवडीसाठी बेणे

लागवडीसाठी हेक्टरी ६०० किलो बेणे पुरेसे होते. लागवडीसाठी सुधारित जातीचे बेणे वापरावे. लागवडीसाठी मागील हंगामात निघालेले थंड व कोरड्या जागेत साठवून पुरेशी विश्रांती मिळालेले बेणे वापरावे. लसणाची लागवड (कुड्या) पाकळ्या लावून केली जाते. मोठे, सारख्या आकाराचे, निरोगी गाठी बेण्यासाठी निवडावेत. कंदातून पाकळ्या अलगद वेगळ्या कराव्यात. पाकळीवरच्या पापुद्र्याला इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. सारख्या आकाराच्या टपोऱ्या (८ ते १० मि.मी लांब) निवडक कुड्या किंवा पाकळ्या लागवडीसाठी वापराव्यात. लहान पाकळ्या लावल्या तर कंद उशिरा तयार होऊन उत्पादन कमी मिळते.

- हवामान : लसूण पीक तापमानास अत्यंत संवेदनशील असून दर्जेदार उत्पादनासाठी शिफारस केलेल्या हंगामामध्येच लागवड करावी. पीक वाढीच्या सुरुवातीच्या काळात थोडे दमट व थंड हवामान, तर पक्व होताना व काढणीवेळी कोरडे हवामान गरजेचे असते. या काळात लसणाच्या पाकळ्या लावल्यानंतर पानाची वाढ होते व त्याची संख्या वाढते. हा काळ साधारणपणे ४५ ते ५० दिवसांचा असतो. यानंतर पाकळ्या पोसू लागतात व लसूण कंद आकाराने वाढू लागतो. हा कालावधी ३० ते ४० दिवसांचा असतो. या काळात हवेतील आर्द्रता कमी व वाढलेले तापमान फायद्याचे ठरते. त्यामुळे पात वाळणे, कंद सुकणे या क्रिया सुलभ होतात.
- जमीन : लसणाचा कंद जमिनीत पोसत असल्याने वाढीकरिता पाण्याचा उत्तम निचरा होणारी, भरपूर सेंद्रिय पदार्थ असलेली भुसभुशीत व कसदार जमीन लागते. जमिनीचा सामू ६.५ ते ७ असावा. मध्यम काळ्या भरपूर सेंद्रिय पदार्थ असलेल्या जमिनीत जास्त उत्पादन घेता येते. चांगला कंद पोसण्यासाठी जमिनीचा एक ते दीड फुटांपर्यंतचा भाग भुसभुशीत असणे आवश्यक आहे.
- पूर्वमशागत : लसणाचे कंद जमिनीत पोसतात. लसणाची मुळे १५ ते २० सेंमी खोलीपर्यंत जात असल्याने ३० ते ४० सेंमी खोलीपर्यंत जमीन चांगली भुसभुशीत असणे आवश्यक आहे. शेवटच्या कुळवणीवेळी हेक्टरी २५ ते ३० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे.
- सुधारित जाती : लागवडीसाठी फुले नीलिमा, फुले बसवंत, गोदावरी, श्वेता तसेच यमुना सफेद, ॲग्रीफाऊंड व्हाइट, भीमा ओंकार या जातींची निवड करावी.
- बीजप्रक्रिया : लागवडीपूर्वी लसणाच्या पाकळ्यांवर कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे प्रक्रिया करावी. लागवडीपूर्वी लसणाच्या पाकळ्या द्रावणात दोन तास बुडवून मग लागवड करावी.
- पाणी व्यवस्थापन : लसणाच्या पाकळ्या लावल्यानंतर पहिले पाणी लगेच द्यावे. दुसरे पाणी त्यानंतर ३ ते ४ दिवसांनी द्यावे. त्यानंतर ८ ते १० दिवसांच्या अंतराने जमिनीच्या मगदुरानुसार सिंचन करावे. लसणाची मुळे जमिनीत १५ ते २० सेंमीपर्यंतच्या थरात असतात. त्यामुळे वरच्या थरात कायम ओलावा असणे आवश्यक आहे. पिकास जास्त पाणी किंवा पाण्याचा ताण किंवा वाफ्यांमध्ये पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी.




- आंतरपीक पद्धती : लसूण पिकामध्ये वाफ्यांच्या वरंब्यावर कोबी, कोथिंबीर किंवा मुळा इत्यादी कमी कालावधीच्या पिकांची लागवड करता येते. तसेच लसणाची आंतरपीक म्हणून ऊस, मिरची, फळबागांमध्ये देखील लागवड करता येते.
- आंतरमशागत : लागवडीनंतर सुरुवातीच्या दीड महिन्यात पिकात मोठ्या प्रमाणात तणांचा प्रादुर्भाव होतो. त्यासाठी खुरपणी करून तणनियंत्रण करावे. कंद वाढायला सुरुवात झाल्यानंतर खुरपणी करताना कंदांना इजा होण्याची शक्यता असते. म्हणून उशिरा खुरपणी करू नये. लागवडीनंतर अडीच महिन्यापर्यंत म्हणजे कंद भरायला सुरुवात होण्याच्या काळात पिकाला मातीची भर द्यावी. त्यामुळे कंदाची वाढ चांगली होऊन उत्पादनात वाढ होते.

## लागवड तंत्र

रब्बी हंगामामध्ये ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात लागवड करावी. उशिरा लागवड केल्यास लसणाच्या कंदाचा आकार कमी होतो, वजन कमी भरते. परिणामी उत्पादनात घट होते. लसणाची लागवड सपाट वाफ्यात केली जाते. जमिनीच्या उताराप्रमाणे ४ बाय २ किंवा ३ बाय २ मीटर अंतराचे सपाट वाफे तयार करावेत. जमिनीचा उतार जास्त असल्यास लहान आकाराचे सपाट वाफे तयार करावेत. जमीन सपाट असल्यास १.५ ते २ मीटर रुंद व १० ते १२ मीटर लांब सरी वाफे तयार करावेत. निवडलेल्या पाकळ्या सपाट वाफ्यात रुंदीशी समांतर १५ सेंमी अंतरावर खुरप्याने रेषा पाडून त्यात १० सेंमी अंतरावर पाकळ्या उभ्या लावून कोरड्या मातीने झाकाव्यात.

## खत व्यवस्थापन



माती परीक्षणानुसार नत्र १०० किलो, स्फुरद ५० किलो आणि पालाश ५० किलो प्रति हेक्टरी द्यावे. यापैकी नत्राची अर्धी मात्रा (हेक्टरी ५० किलो) आणि स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा लागवडपूर्वी द्यावी. उर्वरित नत्राची मात्रा लागवडीनंतर ३०, ४५ व ६० दिवसांनी तीन समान हप्त्यांत विभागून द्यावी. लागवडीनंतर ६० दिवसांनी नत्र खताची मात्रा देऊ नये. कारण त्यामुळे उत्पादन व साठवणुकीवर विपरीत परिणाम होतो. लसूण हे पीक गंधकयुक्त खतास चांगला प्रतिसाद देते. त्यामुळे लागवड करण्यापूर्वी हेक्टरी ५० किलो गंधक जमिनीत मिसळावे.

# 'ॲग्री स्टॅक' योजना आहे काय?

कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शेतकऱ्यांना जलदगतीने सेवा देण्यासाठी युनिक आयडीचा उपयोग होणार आहे. यात शेतकऱ्यांच्या नावावर शेतजमीन असेल तर त्यांना फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळख क्रमांक दिला जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कृषिविषयक सेवा, सुविधा तसेच शासकीय योजनांचे लाभ पारदर्शकपणे मिळू शकतील. यासाठी 'ॲग्री स्टॅक' नावाने डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यात आला आहे. याची नोंदणी प्रत्येक महा ईसेवा केंद्रावर सुरू असून ॲग्री स्टॅक उपक्रमाची गावस्तरावर मोहीम राबवून सर्व शेतकऱ्यांचा फार्मर आयडी तयार होण्यासाठी हा उपक्रम प्रशासनाकडून प्राधान्याने हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाबाबत शेतकऱ्यांना अनेक प्रश्न पडले असतील. आपण याठिकाणी या उपक्रमाबाबत विस्ताराने पाहू...

**सचिन अडसूळ**
**जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर**

महाराष्ट्रात कृषी क्षेत्राशी संबंधित लोकसंख्या ५५ टक्के आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनाद्वारे अनेक महत्त्वपूर्ण योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपलब्ध संसाधनांचा उचित विनियोग करून योग्य व पात्र लाभार्थ्यांपर्यंत लाभ पोहचवून कृषी क्षेत्राचा अधिकाधिक विकास शक्य आहे. केंद्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या ॲग्री स्टॅक योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ॲग्री स्टॅक हे कृषी क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरून शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहचण्यासाठी स्थापित केले जाणारे डिजिटल फाउंडेशन आहे. कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे हा ॲग्री स्टॅक उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रकल्पामुळे माहिती आधारित योग्य निर्णय घेणे, गरजू शेतकऱ्यांना योग्य वेळी सेवा प्रदान करणे, कृषी उपक्रमांची कार्यक्षमता सुधारणे शक्य होईल. विविध शेतकरी आणि कृषी-केंद्रित योजनांची आखणी करणे व अंमलबजावणी करणे सुलभ होईल. विविध योजनांतर्गत शेतकऱ्यांना लाभ देताना आधार प्रणालीचा वापर करून लाभार्थीची ओळख पटविण्यात येते. तसेच महसूल विभागाने त्यांच्याकडील अधिकार अभिलेखाचे तसेच गाव नकाशांचे संगणकीकरणाचे काम पूर्ण केले आहे. त्या अभिलेखांपैकी अधिकार अभिलेख हे संगणकीय पद्धतीने अद्ययावत केले जात असल्याकारणाने तात्काळ उपलब्ध होऊ शकतात. याशिवाय महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग संस्थेने राज्यातील जमिनींचे भू संदर्भीकरण करून दिले आहे. यामुळे शेत जमिनीची इत्यंभूत अद्ययावत माहिती डिजिटाईज स्वरुपात तात्काळ उपलब्ध होत आहे. त्यामुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लॅंड पार्सल) यांचा माहिती संच तयार करण्यासाठी आवश्यक मूलभूत माहिती उपलब्ध आहे. सर्व प्रथम बीड जिल्ह्यात २०२३-२४ या वर्षात ॲग्री स्टॅक अंतर्गत शेतकऱ्यांचा आधार जोडणी केलेला माहिती संच निर्मिती करण्याचा पथदर्शी कार्यक्रम राबविण्यात आला. बीड जिल्ह्यातील पथदर्शी कार्यक्रमातील या आशादायक व दूरगामी परिणाम करणाऱ्या अनुभवावरून महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रात कालबद्ध पद्धतीने ॲग्री स्टॅक योजना अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले आहे.

## ॲग्रिस्टॅक योजनेचा उद्देश

शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच व शेतांचे भू संदर्भिकृत माहिती संच एकत्रितरित्या तयार करणे व सातत्याने अद्ययावत करणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. याचबरोबर शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र-राज्य शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना सुलभ, पारदर्शक पद्धतीने तसेच वेळेवर उपलब्ध करणे, शेतकऱ्यांना स्वस्त कर्ज, उच्च गुणवत्तेची कृषी निविष्ठा, विपणन, स्थानिक आणि विशिष्ट तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत अधिक माहितीपूर्ण आणि सोयीस्कर प्रवेश मिळवून देणे, शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ जलदगतीने देण्यासाठी शेतकऱ्यांची ओळख पटवण्याची पारदर्शक व सोपी पद्धत विकसीत करणे तसेच प्रमाणिकरणाची सुलभ पद्धत विकसित करणे, कृषी व संलग्न विभाग यांच्यात विविध योजनांच्या अभिसरण प्रक्रियेत सुलभता आणणे आदींचा समावेश आहे.



## योजनेचे फायदे

ॲग्रिस्टॅकमुळे पीएम किसान योजनेंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यकतेच्या अटी पूर्ण करून लाभ प्राप्त करण्यामध्ये सुलभता येईल. पीएम किसान योजनेंतर्गत पात्र सर्व लाभार्थी समाविष्ट करून घेण्यास सहाय्य मिळेल. शेतकऱ्यांना पिकासाठी कर्ज मिळवण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि कृषी इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्जे उपलब्ध करून घेण्यात सुलभता राहील. पिक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शेतकऱ्यांचे देय नुकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात सुलभता येईल. किमान आधारभूत किंमतीवर खरेदीमध्ये शेतकऱ्यांचे नोंदणीकरण ऑनलाईन पध्दतीने होऊ शकेल. शेतकऱ्यांसाठी कृषी कर्ज, वित्त, निविष्ठा आणि इतर सेवा देणाऱ्या यंत्रणांना कृषी सेवा सहजपणे उपलब्ध करून देण्यासाठी सुलभता येईल. शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी, कृषी व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री) च्या उपलब्ध आकडेवारीच्या आधारे योजनांचा लाभ वितरीत करण्यामध्ये सुलभता येईल आणि लाभार्थ्यांची वारंवार प्रमाणिकरणाची आवश्यकता राहणार नाही.

## शॉर्ट न्यूज

### खड्डे पडल्याने रस्त्याची दुरवस्था

■ **पारनेर :** नगर-पुणे मुख्य रस्त्याला जोडला जाणारा पारनेर तालुक्यातील जवळे राळेगण थेरपाळ ते गव्हाणवाडी फाटा या मुख्य रस्त्यावर कोहकडी फाटा परिसरात मोठमोठे खड्डे पडल्याने या मार्गावरील वाहतूक धोकादायक झाली आहे. गेल्या चार वर्षात दोनवेळा रस्त्याचे काम झाले; मात्र दोन्ही वेळा काम करताना परिसरातील शेतकऱ्यांना पाईपलाईनबाबत योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने काम पूर्ण झाल्यानंतर पाईपलाईनसाठी रस्ता खोदला गेला. त्यामुळे या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत.

### राहुरीत महिलेचा विनयभंग

■ **राहुरी :** शहरातील एका ४० वर्षीय महिलेच्या घरात दुपारच्या सुमारास दोघांनी घुसून तिचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. याबाबत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दोन आरोपी तरुणांनी शिवीगाळ करून सदर महिलेच्या घराच्या दरवाजाला लाथा मारल्या. तेव्हा सदर महिला दरवाजा उघडून बाहेर आली. आरोपींनी शिवीगाळ करत तुझा मुलगा कोठे आहे अशी विचारणा केली. आरोपींनी महिलेच्या गळ्यातील पोत तोडून नुकसान केले. तसेच तिचा हात पकडून साडीचा पदर ओढून लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केले. नंतर आरोपींनी सदर महिलेला जिवे मारण्याची धमकी दिली.

### श्रीरामपुरातील कत्तलखान्यावर छापा

■ **श्रीरामपूर :** गोवंशी जातीच्या जिवंत जनावरांची कत्तल करणाऱ्या पाच जणांना शहर पोलिसांनी छापा टाकून जिवंत जनावरे, गोमांस व मुद्देमालासह अटक केली. या कारवाईत दीड लाख रुपयांचे ५०० किलो गोमांस, दीड लाखाच्या ४ गाया, १ बैल व ३० हजार रुपयांची ६ वासरे असा एकूण ३ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. मोसीन इस्माईल कुरेशी (रा. गोल्डन सॉ मिलजवळ, श्रीरामपूर), अब्रार इस्माईल कुरेशी, नजीर बशीर पठाण, शाकीर युसूफ कुरेशी व मोहम्मद कैफ जलीस कुरेशी (सर्व रा. ममदापूर, ता. राहाता) यांना पोलिसांनी अटक केली आहे.

### राहाता बाजार समितीत हरभरा ५७३५ रुपये

■ **राहाता :** बाजार समितीत हरभऱ्याला जास्तीत जास्त ५७३५ रुपये भाव मिळाला. हरभऱ्याची २६ क्विंटल आवक झाली. हरभऱ्याला किमान ५५०० रुपये, जास्तीत जास्त ५७३५ रुपये तर सरासरी ५६१५ रुपये भाव मिळाला. सोयाबीन ला सरासरी ४०११ रुपये भाव मिळाला. डाळिंबाच्या १६ क्रेट्सची आवक झाली. डाळिंबाला किमान ५०० रुपये, जास्तीत जास्त २५०० रुपये, तर सरासरी १९०० रुपये. कोल्हार उपआवारात गव्हाला किमान २७५० रुपये, जास्तीत जास्त ३२०० रुपये तर सरासरी २९७५ रुपये भाव मिळाला.

### अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळला

■ **नगर :** शहरातील नालेगाव अमरधाम येथे एका ३८ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आला. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. नालेगाव अमरधाम येथे बेशुध्द अवस्थेत एक ३८ वर्षीय तरुण आढळून आल्याने त्याला रुग्णवाहिकेतून उपचारासाठी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. बटुळे यांनी त्याला औषध उपचारापूर्वीच मयत घोषित केले. तशी माहिती त्यांनी कोतवाली पोलिसांना दिली. त्यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# नाविन्याचा वेध घेणारा अवलिया !

## मा. उपनगराध्यक्ष चंद्रकांत चेडे /वाढदिवस विशेष



युवा उद्योजकांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व चंद्रकांत चेडे हे नाव घेतले तरी कोणीही सहजपणे सांगून जाते की हे अजब रसायन आहे ! नेहमीच कार्यमग्न असणारे हे व्यक्तिमत्व सतत नाविण्याचा वेध घेत असते. शुन्यातून विश्व निर्माण करताना चंद्रकांत चेडे यांनी निर्माण केलेले स्वतःचे वलय अनेक युवा उद्योजकांसाठी प्रेरणादायी आहे. नाविन्याचा वेध घेणाऱ्याया अवलियाचा शनिवारी वाढदिवस. त्यानिमित्ताने त्यांच्या कार्यकर्तुत्वाचा घेतलेला हा आढावा. शेतकरी कुटूंबात जन्म. आई वडीलांचे जेमतेम शिक्षण. मात्र शिक्षण हेच आपले बागायत समजून चंद्रकांत चेडे यांनी प्राथमिक शाळेपासून शिक्षणाचा ध्यास घेत शास्त्र शाखेतून पदवी घेतली. सहसा मराठा समाजातील मुले शिक्षणानंतर नोकरीचा शोध घेण्यास पसंती देतात. मात्र चंद्रकांत चेडे यांनी त्यास छेद देत व्यवसायात उडी घेण्याचा धाडसी निर्णय घेतला. मराठा समाजाची मुले व्यवसायात यशस्वी होत नाहीत हा अनेकांचा समज. मात्र सुरूवातीस भुसा पेंडीचा व्यवसाय सुरू केलेल्या चंद्रकांत चेडे यांनी घेतलेली गगणभरारी पाहिली तर कोणीही आश्चर्याने तोंडात बोट घालेल ! भुसा, पेंड या दुग्ध व्यवसायाशी निगडीत व्यवसायातून स्वतःच्या व्यवसायाची मुहूर्तमेढ केल्यानंतर त्यांनी दोन हॉटेल, दुध संकलन केंद्र, पतसंस्था तसेच किसान शिक्षण संकुलाच्या माध्यमातून त्यांना यशाची शिखरे पादाक्रांत केली आहेत. व्यवसायाबरोबरच राजकारण, समाजकारणातही त्यांचा दबदबा आहे. नव्या पिढीसाठी त्यांचा हा प्रवास प्रेरणादायी आहे.

### राजकारणातही ठसा

**व्यवसायात यशस्वी होताना चेडे हे समाजकारण, राजकारणातही आघाडीवर आहेत. विविध सामाजिक उपक्रम राबवत त्यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपण्याची जाणीवपुर्वक काळजी घेतली. पारनेर ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत उतरून त्यांनी ग्रामपंचायतचे सदस्यपद भुषविले. पुढे नगरपंचायतीची स्थापना झाल्यानंतरही त्यांनी नगरसेवक पदाची निवडणूक जिंकत राजकारणातील आपले स्थान पक्के केले.नगराध्यक्षपदाच्या निवडीवरून वाद झाल्यानंतर मुत्सदीपणाने तत्कालीन आमदार विजय औटी यांच्या उमेदवाराविरोधात बंड करत त्यांनी त्यांच्या विचारांचा नगराध्यक्ष विराजमान केला. उपनगराध्यक्षपद स्वतः भुषवत त्यांनी राजकारणातील आपले वेगळेपण सिध्द केले.**

**विजय वाघमारे**
कार्यकारी संपादक, पारनेर दर्शन

### हॉटेल व्यवसायाचे वेगळेपण

**पुष्कराज हॉटेल सुरू करून हॉटेल व्यवसायात पदार्पण केल्यानंतर चंद्रकांत चेडे यांनी त्यात ठसा उमटविला. याच अनुभवाच्या जोरावर बस स्थानक परिसरात त्यांनी ऋषिकेश या शाकाहारी हॉटेलची सुरूवात केली. दोन्ही हॉटेलमधील वेगवेगळया पदार्थांमुळे या हॉटेलचे वेगळेपण अधोरेखीत होते. स्वच्छता तसेच ग्राहकांना काय हवे आहे याचा विचार करून देण्यात येणारी सेवा यामुळे चेडे यांच्या मार्गदर्शनाखालील दोन्ही हॉटेल ग्राहकांच्या पसंतीस उतरलेली आहेत.**

### सहकार क्षेत्रात पाऊल

**किसान युनियन पतसंस्थेच्या माध्यमातून चंद्रकांत चेडे यांनी सहकार क्षेत्रात पाउल टाकले. विशेषतः तरूण शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय, वाहने तसेच व्यवसायासाठी कर्ज देत चेडे यांनी त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले. पतसंस्था चळवळीमध्ये मध्यंतरी मोठे वादळ उठले मात्र त्यातही चंद्रकांत चेडे यांची किसान पतसंस्था पारदर्शकपणा, सचोटीच्या जोरावर दिपस्तंभाप्रमाणे उभी होती.**

### किसान शिक्षण संकुल

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी भागाप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी चेडे यांनी किसान बहुउददेशिय संस्थेची स्थापना करून सुरूवातीस इंग्रजी माध्यमाचे स्कुल सुरू केले. वैद्यकिय, अभियांत्रीकी अभ्यासक्रमांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या सीबीएसई या अभ्यासक्रमाची गरज ओळखून त्यांनी अल्पावधीत तालुक्यातील पहिले सीबीएसई स्कुल सुरू केले. पुढे शास्त्र शाखेचे उच्च माध्यमिक शिक्षण, व त्यानंतर कला, वाणिज्य व शास्त्र विभागाचा पदवीचा अभ्यासक्रमही त्यांनी सुरु केला. विधी महाविद्यालयाच्या माध्यमातून त्यांनी तालुक्यात प्रथमच विधी अभ्याक्रमाची सुविधा उपलब्ध करून दिली.**

# शिर्डी परिक्रमेत १.७५ लाख भाविकांचा सहभाग !

## साईनामाचा गजर | परदेशातील ५ हजार नागरिक

**शिर्डी : प्रतिनिधी**

**श्री साईबाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यभूमी शिर्डीनगरीत देश-विदेशातील १ लाख ७५ हजार साईभक्तांनी महाकुंभ परिक्रमा साईनामाचा जयघोष करत भक्तिमय वातावरणात पूर्ण केली. मागील वर्षांपेक्षा २५ हजार भाविकांची संख्या यंदा अधिक होती. सुमारे १४ किमीचे अंतर सहा तासांत भाविकांकडून पूर्ण करण्यात आले. यात ५ हजार परदेशी नागरिकही होते.**

विश्वाला श्रद्धा आणि सबुरीचा संदेश देणाऱ्या शिर्डीनगरीत महापरिक्रमेची वाटचाल साईबाबांनी दिलेल्या संदेशाप्रमाणेच होत आहे. शिर्डी शहरात ग्रीन अँड क्लीन शिर्डी फाउंडेशन, शिर्डी ग्रामस्थ तसेच श्री साईबाबा संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिर्डी महापरिक्रमेचे यंदाचे हे सहावे वर्ष होते. गुरुवारी पहाटे साडेपाच वाजता ''आओ साई' खंडोबा महाराज मंदिरापासून सुरू झालेल्या व १४ किमी अंतर असलेल्या शिर्डी परिक्रमेसाठी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, महंत



रामगिरी महाराज, महंत काशीकानंदगिरी महाराज, साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, माजी नगराध्यक्ष कैलासबापू कोते, माजी उपनगराध्यक्ष अभय शेळके, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कमलाकर कोते, मुकुंद गोंदकर आदींसह देश-विदेशातील लाखोंच्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती.

पहाटेच्या ब्रह्ममुहूर्तावर साईनामाचा जयघोष करत साईनगरी भक्तिमय वातावरणात चिंब झाली होती. पहाटे साडेपाच वाजता आओ साई खंडोबा मंदिरात आरती केल्यावर बाहेर रथासमोर गंगा आरतीप्रमाणे महाआरती करण्यात आली. त्यानंतर परिक्रमेला प्रारंभ झाला. या वेळी १४ किमीच्या परिक्रमा मार्गावर सडा, रांगोळी आणि फुलांची सजावट करण्यात आली होती. अनेक ठिकाणी घरांवर गुढ्या उभारल्या होत्या. परिक्रमावासीयांच्या सेवेसाठी ठिकठिकाणी चहा, पाणी, नाष्टा यासह रुग्णवाहिका, वैद्यकीय पथके तयार ठेवली होती. यामध्ये मध्य प्रदेशातील केरळ येथील वाद्य पथक, लेझीम, वारकरी पथक, परिसरातील शाळेच्या १८०० विद्यार्थ्यांनी साकारलेले विविध वेशभूषातील चित्ररथ आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले.

शिर्डीतील साईबाबांच्या प्रमुख चार उत्सवांमध्ये आता शिर्डी परिक्रमा या पाचव्या ऐतिहासिक उत्सवाची भर पडली. पावलोपावली अन्नदानासाठी हजारो हाथ सरसावले होते. शिर्डीकरांसाठी खरे तर हा अतिशय आनंदाचा क्षण होता. परिक्रमेत मोठ्या संख्येने महिला-भगिनी सहभागी झाल्या होत्या. फुगड्या, साईभजन, भक्तिमय वातावरणात मार्गक्रमण करत ही परिक्रमा पूर्ण केली. परिक्रमेचा समारोप साई मंदिर परिसरातील १६ गुंठ्यातील सभामंडपात करण्यात आला. या वेळी प्रथमच श्रीसाईबाबा संस्थानच्या वतीने भाविकांना बुंदी प्रसाद पाकिटाचे वाटप करण्यात आले.

**भाविकांसाठी उत्कृष्ट सोयी-सुविधांची व्यवस्था**

साई संस्थान आणि स्थानिक प्रशासनाने भाविकांसाठी उत्कृष्ट सोयी-सुविधांची व्यवस्था केली होती. १५ ठिकाणी स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या. ५ वैद्यकीय पथके आणि १०० पॅरामेडिकल स्टाफ सतत तैनात होते. दीड लाख पाण्याच्या बाटल्यांचे वितरण करण्यात आले. १०० मोबाइल टॉयलेटची सोय करण्यात आली. वृद्ध आणि दिव्यांग भाविकांसाठी ४ विशेष बस उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. १००० हून अधिक पोलिस आणि सुरक्षा रक्षक परिक्रमेच्या मार्गावर सतत गस्त घालत होते.

**वाचकांच्या लेखणीतून**

# मातीचे महिमान

माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जागल्या
दऱ्याखोऱ्यांतील शिळा
ही कवी कुसुमाग्रजांची सुंदर कविता आम्हाला शालेय अभ्यासक्रमात नेमलेली होती. तिच्यातील मातीशी असलेले कवीचे इमान मला फार भावले. त्याचे संस्कार म्हणून की काय, मीही १९८४-८५ साली एक देशभक्तीपर गीत लिहिले होते. गावच्या माध्यमिक शाळा शिक्षकाने त्याला सुंदर चाल लावली आणि विद्यार्थी मुलामुलींकडून ते प्रजासत्ताक दिनी शालेय कार्यक्रमात गाऊन घेतले. त्याचे ध्वनिमुद्रण मी ऐकले तेव्हा हे गीत मीच रचले आहे का, असा प्रश्न मला पडला! इतकी सुंदर चाल आणि मधुर समूहगायनाची साथ त्या गीताला मिळाली होती. त्या गीताचे पहिले कडवे होते :-
स्वतंत्र अमुची भारतमाता
स्वतंत्र इथली माती
दुष्ट स्पर्श तो तिला कराया
नाहि कुणाची छाती
१९७९ सालची दिवाळी असावी. तेव्हाच्या रागिणी नामक दिवाळी अंकात माझी मर्म शीर्षकाची एक कविता प्रकाशित झाली होती. त्या कवितेचे पालुपद होते :-
या मातीतुन जन्म घेतला मातीला मिळणार
मर्म यातले कधी मानवा तुजला रे कळणार?
हिंदीत संत कबीरांचे एक भजनच आहे :-
माटी कहे कुम्हार से तू क्या रुंढे मोहे




एक दिन ऐसा आयेगा मैं रूंढूंगी तोहे
आपण मातीतून जन्म घेतो. त्याच मातीवर बसतो, उठतो, नाचतो. मानव जन्म लाभल्याचा गर्व वाहतो. याला उद्देशून माती कुंभाराला सांगते, तू माझा चिखल करून मला तुडवतुडव तुडवतोस ; पण लक्षात ठेव. तू काय मला तुडवतोस? मीच तुला एक दिवस तुडवणार आहे. आता तू मातीवर आहेस. परंतु तू मरशील तेव्हा या मातीखालीच असशील! माणसाला आपली औकात कळावी म्हणून संत कबिरांनी येथे मातीचे प्रतीक म्हणून सुंदर उपयोजन केले आहे.
उर्दू भाषेतील एका नज़्ममध्ये (कवितेमध्ये) मातीचे सुंदर वर्णन आढळते :-
बैठ जाता हूं, मिट्टी पे अक्सर, मुझे
अपनी औक़ात अच्छी लगती है।
मी नेहमी मातीवरच बसतो. (कारण) मला माझी पात्रता चांगलीच ठावूक आहे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# पळशी आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिकेचे निलंबन !

## आ. काशिनाथ दाते यांनी विधानसभेत उठविला होता आवाज

**पारनेर : प्रतिनिधी**

**तालुक्यातील पळशी येथील ग्रामीण भागातील आदीवासी मुला-मुलींसाठीच्या शासकीय निवासी आश्रमशाळेतील गैरप्रकारांविरोधात आमदार काशिनाथ दाते यांनी आवाज उठविल्यानंतर या गैरप्रकारांची चौकशी होऊन त्यात दोषी आढळल्याने मुख्याध्यापिका सविता कुंडलीक नागरगोजे यांचे निलंबन करण्यात आले आहे.**



आश्रमशाळेतील गैरप्रकारांबाबत आ. दाते यांनी औचित्याच्या मुद्यावर आवाज उठवू या गैरप्रकारांची चौकशी करू दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली होती. या प्रकरणी विधानसभेत आवज उठविण्यात आल्यानंतर शासनाच्या वतीने चौकशी समितीची स्थापना करण्यात येउन चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये मुख्याध्यापिका दोषी आढल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांचे तडकाफडकी निलंबन करण्यात आले.

कर्तव्यात कसुर केल्याचा ठपका ठेवत पुढील आदेश येईपर्यंत मुख्याध्यापिका सविता कुंडलिक नागरगोजे यांच्या विरोधात नाशिकचे आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त संदीप गोलाईत यांनी निलंबनाचा बडगा उगारला. मुख्याध्यापिकेचे निलंबन झाल्याने आश्रमशाळांमधील अधिकारी तसेच कर्मचारी यांचे धाबे दणाणले आहे.

### कसुर केल्यास कारवाई

**आश्रमशाळेतील गैरप्रकाराबाबत विधानसभेत प्रश्न उपस्थित करून विद्यार्थ्यांसाठी पाण्याची व्यवस्था, मुलांना खाण्यासाठी आणलेले फळे, पालेभाज्या हे खराब असून त्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे सरकारच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. चौकशीमध्ये मुख्याध्यापिकेने गैरप्रकार केल्याचे उघड झाल्यानंतर त्यांचे निलंबन झाले आहे. इतर विभागाच्या अधिकाऱ्यांनी कसुर केल्यास त्यांच्यावरही अशीच कारवाई करण्यात येईल.**

**आमदार काशिनाथ दाते**
विधानसभा सदस्य

# ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करू

## मंत्री चंद्रकांत पाटील यांची ग्वाही

**सुपा : प्रतिनिधी**

**राज्यातील ग्रंथालयांच्या अनुदानामध्ये ४० टक्के वाढ, ग्रंथालयांच्या दर्जात सुधारणा तसेच नव्या २०० ग्रंथालयांना मान्यता देण्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी तत्वतः मान्य केले.**

मा. मंत्री आ. संजय बनसोडे व आ. अभिमन्यू पवार यांच्या पुढाकारातून सार्वजनिक ग्रंथालयांच्या प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मंत्री पाटील यांच्यासह प्रधान सचिव बी वेणूगोपाल रेड्डी, उच्च व तंत्रशिक्षण सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषि विभाग प्र.संचालक अशोक गाडेकर यांच्यासह ग्रंथालयांच्या प्रतिनिधींसमवेत बैठक पार पडली. त्यावेळी पाटील यांनी सर्वतोपरी मदतीचे अश्वासन दिले.

बैठकीस डॉ. गजानन कोटेवार, डॉ. राजेश्वर बालेकर, सुनील वायाळ, राम मेकले, सदाशिव बेडगे, डी. बी. देशपांडे, प्रभाकर कापसे, राम मोतीपवळे, संजय सुर्यवंशी, सुरेंद्र शिंदे, विष्णूपंत पवार, बालाजी कांगणे आदी उपस्थित होते.



सार्वजनिक ग्रंथालयांच्या विविध प्रश्नांसंदर्भात मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली.

### अनुदान वाढीचा प्रस्ताव मांडणार

४० टक्के अनुदान वाढीसाठी आ. पवार व आ बनसोडे यांनी पत्र द्यावे. अनुदान वाढीचा प्रस्ताव तयार करून मंत्री मंडळाच्या बैठकीत तो ठेवण्यात येईल. ग्रंथालय कर्मचाऱ्यांना किमान वेतन देणे अशक्य आहे त्यामुळे अनुदानातूनच कर्मचाऱ्यांचे वेतन करण्याच्या सुचना पाटील यांनी दिल्या.

### दर्जोन्नतीसाठी २० कोटी

सन २०१२ पासून ग्रंथालयांचे वर्ग बदल बंद आहेत. ड वर्ग वाचनालयांचा आढावा घेण्यात येउन त्यासाठी आवष्यक २० कोटी रूपयांचा निधी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून देण्याचे मंत्री पाटील यांनी मान्य केले. दर्जोन्नतीची कार्यवाही तात्काळ सुरू करण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या.

### जिल्हा नियोजनमधून ग्रंथ खरेदी

ग्रंथ खरेदीसंदर्भात जिल्हा नियोजन मंडळास जो निधी दिला जातो त्यातून एक टक्का निधीची तरतुद करण्याचा प्रयत्न आहे. ग्रंथालयांनी ग्रंथांची निवड करायची व ते ग्रंथ जिल्हा नियोजन मंडळाकडून खरेदी करून सार्वजनिक ग्रंथालयांना त्यांच्या वर्गवारी नुसार पुरवठा करण्याची योजना आहे. त्यातून ग्रंथालयांचा ग्रंथ खरेदीचा भार कमी होईल.

**चंद्रकांत पाटील**
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

# रांजणखळगे परिसरात निवृत्त पुणेकर रमले !

## निघोजकरांनी निसर्गाचा ठेवा जपल्याच्या भावना

**निघोज : प्रतिनिधी**

**पुणे येथील सेवानिवृत्त नागरीक व त्यांच्या कुटूंबिय निघोजच्या रांजणखळगे परिसरात तब्बल चार तास रमले. या ठिकाणी सिंगापूर धर्तीचा झुलता पुल, पतवेवर जाउन त्यांनी रांजणखळगे पाहत तेथील खडक तसेच विविध आकारामध्ये खडकांमध्ये झालेल्या विविध नैसर्गिक कलाकृतींची पाहणी करत आनंद लुटला.**

रांजणखळगे परिसराची पाहणी केल्यानंतर तेथील राज्यात जागृत देवस्थान म्हणून प्रसिध्द असलेल्या आई मळगंगा मातेचे सर्वांनी दर्शन घेतले. या परिसरात असलेल्या निसर्ग हॉटेलमध्ये तासभर विश्रांतीनंतर हॉटेलचे मालक सौरभ सुरेश वराळ यांनी त्यांचे स्वागत करून त्यांचा पाहुणचार केला.

कुंड परिसराच्या पाहणीनंतर पाहुण्यांनी निघोजमध्ये येत मळगंगा मातेचे दर्शन घेतले. नवी, जुनी पेठ येथील



बारवेची पाहणी करून गावातील विकासाविषयी समाधान व्यक्त केले. या पाहुण्यांमध्ये सेवा निवृत्त मुख्याध्यापक शिवाजीराव जाधव, बाळासाहेब तनपुरे, बबनराव कोल्हे सुरेश बिराडे, श्रीमती सुलोचना बोबडे, श्रीमती नलीनी जाधव, तारामती इंदलकर, मंगला ढमाले, श्रीमती रामपुरे आदी ३४ पुणेकरांचा समावेश होता.

### निखळ आनंद देणारा अनुभव

निघोज येथील कुंड परिसरातील जगप्रसिध्द रांजणखळगे हा परिसर पाहणे म्हणजे मनाला निखळ आनंद देणारा अनुभव आहे. हा नैसर्गिक अनमोल ठेवा निघोजकरांनी जपला याचे कौतुक वाटते. इथे आणखी काही सोई सुविधांची आवष्यकता आहे. निघोजकर त्या करतील असा विश्वास आहे. आम्ही पुण्यात स्थाईक असलो तरी पुणे व नगर जिल्हयातील असल्याने दोन्ही जिल्हयांमधील तिर्थक्षेत्र व प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी आमची नियमित भ्रमंती सुरू असते.

**शिवाजीराव जाधव**
निवृत्त मुख्याध्यापक

# पारनेरात रविवारी मोफत त्वचारोग शिबिर; ओंकार हॉस्पिटलचा पुढाकार

**पारनेर : प्रतिनिधी**



**पारनेर शहरातील डॉ. श्रीकांत पठारे यांचे ओंकार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व केडगांव, नगर येथील डर्ममेडिका क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर येथे रविवार दि.१६ फेब्रुवारी रोजी मोफत त्वचारोग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**

रविवारी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजण्याच्या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात त्वचा आणि कॉस्मेटिकसाठी मुंबईमध्ये मिळणारे उपचार उपलब्ध होणार आहेत. सामान्य खाज, पिंपल्स, सोरायसिस, पांढरे डाग, जास्त घाम येणे, एक्झिमा, कोड, वांग, गजकर्ण, नागीण, काळे डाग, स्ट्रेच मार्क्स, त्वचेवरील फोडीचे आजार, मुरूमे, ओठांवरील आतल्या फोडी, लुपसचे आजार, स्क्लेरोडर्मा, मस, सुरकुत्या, त्वचेमधील ॲलज, अल्सर, तळ हात-पायाचे आजार, सर्व गुप्त आजार, कुष्ठरोग, केसांचे व नखांचे सर्व आजार यावर मोफत उपचार करण्यात येणार आहेत.

या आरोग्य शिबिरात सर्व प्रकारच्या त्वचेच्या, केसांच्या व नखांच्या आजारांवर तपासणी करून योग्य सल्ला देण्यात येणार असून आरोग्य शिबिरात सहभागी सर्व रूग्णांना औषधेही मोफत दिली जाणार आहेत.

या शिबिराचा तालुक्यातील जास्तीत जास्त रूग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन डॉ. आशुतोष गारूडकर, डॉ. श्रीकांत पठारे, डॉ. पद्मजा पठारे यांनी केले आहे.

# शिवबाच्या पुढाकारातून कोहकडीचा वीज प्रश्न मार्गी

## शेतकरी वर्गामध्ये समाधान



**निघोज : प्रतिनिधी**

**शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे यांच्या नेतृत्वाखाली युवा शेतकऱ्यांनी महावितरणचे उपअभियंता सारंग हातोळकर यांची भेट घेउन कोहकडी येथील विद्युत जनित्राचा प्रश्न मार्गी लावण्यात आला. वीजेचा प्रश्न सुटल्याने कोहकडी येथील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.**

कोहकडी येथील पडवळ वस्तीवरील थ्री फेज ट्रान्सफॉर्मर अनेक महिन्यांपासून नादुरूस्त होता. त्यामुळे या भागातील शेतकरी बांधवांना पिकांना पाणी देण्यात अडचणी निर्माण होत होत्या. तेथील शेतकऱ्यांनी शिवबा संघटनेकडे यासंदर्भात साकडे घातल्यानंतर महावितरणचे उपअभियंता सारंग हातोळकर यांना निवेदन देण्यात आले. यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान आठ दिवसांत ट्रान्सफॉर्मर बसवून देण्याची मागणी करण्यात आली. आठ दिवसांत प्रश्न मार्गी न लागल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला होता. विद्युत जनित्र अथवा वीजेसंदर्भात काही समस्या असल्यास शिवबा संघटनेशी संपर्क करण्यात यावा. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शिवबा संघटना सक्षम असल्याचे शेटे म्हणाले.

यावेळी शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, राजू लाळगे, यश शेटे, दत्ता टोणगे, सचिन कोतकर, नीलेश दरेकर, शांताराम पाडळे, अमित पांढरे, आयुब शेख आदी उपस्थित होते.

### कोणालाही पैसे देऊ नका

सौर उर्जा प्रकल्पासंदर्भात अहवाल देताना संबंधित वायरमन पैशांची मागणी करत असल्याचे तक्रार उपअभियंता हातोळकर यांच्याकडे करण्यात आल्यानंतर कोणी अधिकारी असो वा वायरमन सौर उर्जेचे सर्वेक्षण करण्यासाठी येणारांना कोणीही पैसे देऊ नयेत. हे काम कंपनीचे अधिकारी व कर्मचारी कामाचा एक भाग म्हणून करत आहेत. ते त्यांचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

# आपल्या आवडीचे क्षेत्र निवडा !

## सपोनि अभय दंडगव्हाळ यांचे आवाहन

**टाकळीढोकेश्वर : प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून यश मिळविण्यासाठी कठोर परीश्रम करावेत. जीवनात यशस्वी होण्यासाठी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडण्याचे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक अभय दंडगव्हाळ यांनी केले.**

मातोश्री सायन्स कॉलेज येथे बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दंडगव्हाळ हे बोलत होते. यावेळी त्यांनी स्पर्धा परीक्षा व करिअर या विषयी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष किरण आहेर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

आजचे विद्यार्थी हे उद्याचे देशाचे आधारस्तंभ असल्याचे सांगून यावेळी बोलताना दंडगव्हाळ म्हणाले, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मुलींचे व महिलांचे योगदान कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले.

यावेळी डॉ. दिपक आहेर, बाळासाहेब उंडे, शितल आहेर, डॉ. कृपाल पवार, डॉ. राहुल रहाणे, सत्तार शेख, गणेश हांडे, राजेंद्र साठे, कविता भालेराव, अजिंक्य बिडकर, हेमंत शिंदे, आदी उपस्थित होते.



मातोश्री सायन्स कॉलेज येथे बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात सपोनि अभय दंडगव्हाळ यांनी मार्गदर्शन केले.

### स्वत:वर विश्वास ठेवा

यश आणि अपयश या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अपयश आले तर खचू नका, कोलमडू नका पुन्हा प्रयत्न करा. यश नक्कीच तुमच्या पायाशी लोळण घेत येईल. स्वत:वर विश्वास ठेवा. स्वत:ची किंमत कधीही कमी करून घेऊ नका.

**किरण आहेर**
अध्यक्ष मातोश्री शिक्षण संकुल

### जाल तिथे कष्ट करा

तुमच्या आवडत्या क्षेत्रात करीअर करा. जिथे जाल तिथे कष्ट करा. आपले आई वडील तसेच शाळेचे नाव उज्वल करा. मोबाईल, टीव्ही आदी माध्यमांपासून दुर राहण्यासाठी चांगल्या मित्रांची संगत धरा. प्रत्येकाला नोकरी मिळेल असे नाही त्यामुळे घरच्या शेतीचा व्यवसाय उत्तम प्रकारे करा.

**डॉ. श्वेतांबरी आहेर**, संचालिका

### स्वत:ला कमी समजू नका

ग्रामीण भागातील आहोत किंवा मराठी माध्यमाच्या शाळेत शिकलो म्हणून स्वत:ला अजिबात कमी समजू नका. ग्रामीण भागातील मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळेतच खरी जडण घडण होते खरी गुणवत्ता जन्मास येते. आयुष्यात सतत नवनवीन शिकत रहा. स्वत:मध्ये ज्ञान रूजवत रहा तुम्हाला कोणी हारवू शकत नाही.

**राहुल सासवडे**, प्राचार्य

# दप्तराच्या भेटीने चिमुरडयांच्या चेहऱ्यावर हासू !

## हृदयरोग तज्ञ डॉ. अक्षयदिप झावरे यांचा उपक्रम



**वासुंदे : प्रतिनिधी**

**दरवर्षीप्रमाणेच यंदाही वासुंदे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या चिमुरडयांना नगरमधील सुप्रसिध्द -हृदयरोग तज्ञ डॉ. अक्षयदिप झावरे व त्यांच्या पत्नी स्त्री रोग तज्ञ डॉ. रेखा झावरे यांच्या वतीने मिशन आपुलकी उपक्रमांतर्गत दर्जेदार दप्तरांचे वितरण करण्यात आले. उत्तम रंगीबेरंगी दप्तरे हाती पडल्यानंतर चिमुरडयांच्या चेहऱ्यावर हसू खुलले !**

वासुंद्याचे भुमिपुत्र माजी आमदार स्व. वसंतदादा झावरे पाटील यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून डॉ. अक्षयदिप यांचे आजोबा वासुंद्याचे माजी सरपंच शिवाजीराव झावरे पाटील यांच्या हस्ते या दप्तरांचे वितरण करण्यात आले.

डॉ. अक्षयदिप झावरे हे नगर शहरातील वैद्यकिय क्षेत्रातील प्रतिथयश व्यक्तिमत्व आहे. दानशुर व्यक्तिमत्व म्हणून नगर शहरासह पारनेर तालुक्यात त्यांची ओळख आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर तसेच मान्यवरांकडून प्रेरणा घेऊन मिशन आपुलकी या उपक्रमातून ग्रामीण भागातील शिक्षक लोकसहभागातून विविध शाळांचा कायापालट करण्याचे काम करत आहेत. या शिक्षकांना प्रेरणा देण्याचे काम डॉ. अक्षयदिप व डॉ.रेखा हे झावरे दाम्पत्य करत आहे.

दप्तर वितरण कार्यक्रमाप्रसंगी गुरूदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेचे संस्थापक बा.ठ. झावरे, भाऊसाहेब महाराज शिक्षण प्रसारक शिक्षण मंडळाचे संस्था निरीक्षक शरद पाटील, माजी सरपंच भाउसाहेब सैद, उपसरपंच शंकरशेठ बर्वे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पोपटराव हिंगडे, माजी अध्यक्ष विशाल झावरे, नारायण झावरे, दिलीप पाटोळे, रा.बा. झावरे, मारूती उगले, अंबादास झावरे, सुर्यभान भालेकर, बाळासाहेब झावरे, पोपटराव बर्वे, रामचंद्र झावरे, बबनराव गायके, शांताराम झावरे, सुभाष शिंदे, शिवाजी झावरे, बापू बर्वे, पांडूरंग बर्वे, संपत झावरे, भीमाजी गायके, लक्ष्मण झावरे, अशोक चेमटे शाळेचे मुख्याध्यापक प्रल्हाद झावरे, शिक्षक शोभा हिंगडे, पारूबाई ढोकळे, सुनिता रोहोकले आदी उपस्थित होते.

### हजारोंचे हक्काचे डॉक्टर !

हृदयरोगतज्ञ म्हणून अल्पावधीत नावारूपास आलेले डॉ. अक्षयदिप झावरे हे पारनेर तालुक्यासह नगर जिल्हयातील हृदयरोग रूग्णांचे हक्काचे डॉक्टर आहेत. नियमित तपासणीसाठी गेलेल्या प्रत्येक रूग्णाला योग्य मार्गदर्शन करून त्यांनी दिलेल्या उपचारामुळे त्यांच्या ओपीडीतून बाहेर येणारा प्रत्येक रूग्ण समाधानाचे चार शब्द बोलतो हेच डॉ. अक्षयदिप व डॉ रेखा यांच्या आजवरच्या वैद्यकिय सेवेचे यश आहे.

# महावितरणकडून शेतकऱ्यांची लुट

## उपसरपंच राजू रोडे यांचा गंभीर आरोप

**धोत्रे : प्रतिनिधी**

**महावितरणचे अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांची या ना त्या कारणाने पिळवणूक करण्यात येत असून प्रत्येक कामासाठी शेतकरी वर्गाकडून पैसा उकळला जात असल्याचा गंभीर आरोप धोत्र्याचे सरपंच राजू रोडे यांनी केला आहे.**







यासंदर्भात बोलताना रोडे यांनी सांगितले की, तालुक्यातील प्रत्येक गावात असलेल्या महावितरणच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून शेतकरी वर्गाला वेठीस धरले जाते. एखाद्या गावातील ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर महावितरणचे कर्मचारी शेतकऱ्यांना खाजगी डीपी बसविण्यासाठी प्रवृत्त करतात. त्यासाठी त्या ट्रान्सफार्मरवर येणाऱ्या शेतकऱ्यांकडून पैसे संकलीत केले जातात. त्यानंतर ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येतो. प्रायव्हेट ट्रान्सफॉर्मर बसविला असे भासविले जात असले तरी तो महावितरणच्याच मालकीचा असतो असा गंभीर आरोप रोडे यांनी केला आहे. महावितरणचा ट्रान्सफॉर्मर बसविल्यानंतर शेतकऱ्यांकडून संकीलत करण्यात आलेले पैसे अधिकारी व कर्मचारी यांच्यात वाटून घेतले जात असल्याचा दावाही रोडे यांनी केला आहे.

उन्हाळयाचे दिवस असल्याने आहे त्या शिल्लक पाण्यामध्ये पीके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची कसरत सुरू असताना वीजेचा खोळंबा झाल्यावर महावितरणचे कंत्राटी कर्मचारी शेतकऱ्यांना वेठीस धरून बक्कळ पैसा गोळा करतात. पीके वाचविण्यासाठी शेतकरी पैसा देतात ते अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या घशात जात असल्याचे रोडे यांनी सांगितले.

गेल्या अनेक दिवसांपासून पारनेर तालुक्यात महावितरणच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांमार्फत शेतकरी नागविला जात असून महावितरणच्या या महाघोटाळयाकडे कोणताही राजकीय पुढारी लक्ष देण्यास तयार नाही. त्यामुळे महावितरणच्या कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांविरोधात शेतकरी वर्गामध्ये चिड निर्माण झाली आहे. शेतकरी वर्गाची होत असलेली ही लुट थांबविली गेली नाही तर येत्या काळामध्ये आंदोलन छेडण्याचा इशारा रोडे यांनी दिला आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com